# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

## मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वास्तुशास्त्रज्ञ /नियोजन सल्लागाराच्या पॅनलवर वास्तुशास्त्रज्ञ /सल्लागारांची नेमणूक करण्याबाबत.

## [ २०२३ ते २०२७ करिता ]

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक असलेल्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध गृहनिर्माण व इतर योजनांचे आराखडे /नकाशे तयार करण्याचे काम अनेकदा व्यावसायिक वास्तुशास्त्रज्ञ /समंत्रकांमार्फत तयार करुन घेण्यात येते. खालील बाबींमध्ये स्वारस्य असणा-यांनी विहित नमुन्यात सविस्तर माहिती पाठवावी.

१. गृहनिर्माण योजना
२. लँडस्केपींग कामे

वास्तुशास्त्रज्ञांकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

**अ.** वास्तुशास्त्रज्ञांच्या परिषदेमध्ये (Council of Architecture) नोंदणीकृत.

**ब.** गृहनिर्माण पॅनेलसाठी कमीत कमी ५ वर्षाचा व्यावसायिक अनुभव व लँडस्केप पॅनेलसाठी ३ वर्षाचा अनुभव.

**क.** संमंत्रक वास्तुशास्त्रज्ञांनी कमीत कमी ३ गृहनिर्माण योजनांचे काम प्रत्येकी [किमान रु.४.५ कोटींचे] ३००० चौ.मी. रहिवासी बांधकाम क्षेत्रफळ व १०० चौ.मी पेक्षा कमी नसलेले वाणिज्य बांधकाम पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे.

**ड.** गृहनिर्माण पॅनेलकरिता फर्मच्या सेवेत कमीत कमी एक वास्तुशास्त्रज्ञ व लँडस्केप पॅनेलसाठी एक तत्सम शैक्षणिक पात्रताधारक सहाय्यक असणे आवश्यक आहे.

**इ.** वास्तुशास्त्रज्ञांच्या फर्ममध्ये सर्व पार्टनर COA नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे.

सदर माहिती हि विहित नमुन्यात देणे आवश्यक आहे. याकरिता म्हाडाच्या **https://arcmbpanel.mhada.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा. अर्जाची किंमत रु.२०००/- असून ती रोखीने अथवा मुख्य लेखाधिकारी मुंबई मंडळ या नावाने डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डरद्वारे सहाय्यक लेखाधिकारी कक्ष क्र. २१९, पहीला मजला, गृहनिर्माण भवन .कलानगर. वांद्रे [पुर्व ]मुंबई येथे भरणा करुन त्याची पावती प्राप्त करावी. तदनंतर उपरोक्त संकेतस्थळावर पावतीचा तपशिल भरुन अर्ज प्राप्त करण्यात यावा. संकेतस्थळावरिल अर्जामध्ये नमूद आवश्यक ती माहिती व सर्व कागदपत्रे वाचन्यायोग्य स्कॅन करुन अर्जासोबत सादर करावीत. अर्जाकरिता शुल्क व परिपूर्ण अर्ज संकेतस्थळावर भरण्याची तारीख दि.१२/१/२०२३ ते दि. ३१/०१/२०२३असेल. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

सध्या पॅनल असलेल्या समंत्रक वास्तुशास्त्रज्ञ यांनीही पुन्हा विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जातील कोणतीही माहिती चुकीची आढळल्यास नोंदणी रद्द करण्यात येईल. अर्जदाराच्या निवडीचे सर्वस्वी अधिकार हे मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांचे राहतील. सदर पॅनेलची मुदत ५ वर्ष म्हणजे दि.०१/०१/२०२३ ते दि.३१/०१/२०२७ पर्यंत राहिल.

**मुख्य अधिकारी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई**

F:\anjali\anjali\KULKARNI SIR\PANEL 2023-27\2023-2027.docx